MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२७४ | गुरूवार दि.२७ जुन २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -274 | THURSDAY DT. 27 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## धारूर बँकेच्या शाखेला पोलिसांनी केले सील

धारूर । प्रतिनिधि

सुरेश कुटे सर संचालकावर धारूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल, ५२ लाख ५० हजार रुपये फसवणूक केल्याने केला पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद मागील नऊ महिन्यापासून ज्ञानराजा बँकेचा आर्थिक व्यवहार ठप्प झाले आहेत यामुळे ठेवीदार पैसे मिळत नसल्याने संचालकावर गुन्हे दाखल करत आहे धारूर तालुक्यातील आरणवाडी येथील कल्पना माने यांच्या फिर्यादीवरून सुरेश कुठे संचालक मंडळ यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी बँकेला सील केले आहे ज्ञानराधा बँकेने नागरिकांना जास्तीचा व्यासाची आमिष दाखवून ठेवी गुंतवणूक करण्यास सांगितले मात्र आता नऊ महिने होऊन ही या बँकेच्या आर्थिक व्यवहार बंद आहे सुरेश कुठे मागील सहा महिन्यापासून तारखेवर तारीख देत आहे मात्र प्रत्यक्ष पैसे मिळत नसल्याने आता खातेदार मानसिक त्रास सहन करत आहेत तरी देखील सुरेश कुठे तारीख पे तारीख देत आहेत त्यामुळे शाखा बंद पडण्याच्या मार्गी लागली आहे अजून काही शाखा चालूच आहे यावरून सुरेश कुठे ज्ञानराधा बँकेचे ग्राहकांना पैसे परत करतील का असा प्रश्न पडला आहे ?



# पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात कट रचणं म्हणजे काय एस पी नंदकुमार ठाकूर साहेब सखोल चौकशी करा?

## पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांची सुरक्षा वाढवावी!







- राजकारण बाजूला राहूद्या पण पालकमंत्र्यांवर हल्ला करण्याचे षडयंत्र करू नये. हे चुकीचेच.
- वायरल क्लिप प्रकरणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांचे पद धोक्यात पद काढण्यासाठी पक्षाच्या हालचाली?
- सबंधित क्लिप कोणी व्हायरल केली व का.?
- धनंजय मुंडे यांची गाडी फोडण्याचा कट उघड धनंजय मुंडे यांच्या विरोधात कोण कोण करत होतं प्लॅनिंग सखोल चौकशीची गरज?
- कुंडलिक खाडेचा फोन स्विच ऑफ खाडे म्हणतात तो आवाज माझा नाहीच?
- पंकजाताई मुंडे यांनी सख्ख्या भावापेक्षा जास्त जीव लावला तरी कुंडलिक खांडेनी धोका दिला.
  कुंडलिक खांडे यांचं राजकीय अस्तित्व धोक्यात?
- कुंडलिक खाडे मुंबईत तळ ठोकून
- या अगोदर पणशिवसेना जिल्हाध्यक्ष कुंडलिक खाडे हे अनेकदा वादग्रस्त ठरले आहेत. भाडन हाणामारीच्या केसेस
- धनंजय मुंडे यांच्या गाडी फोडण्याचा कट उघड संबंधित कुंडलीक खाडेच्या रेकॉर्डिंग मध्ये समोरून बोलत असलेल्या व्यक्तीची ही चौकशी होणे गरजेचे?
- कुंडलिक खाडेच्या फोन कॉल रेकॉर्डिंग व्हायरल..
- कुंडलिक खांडे यांचं जिल्हाध्यक्ष पद जाणार?
- कुठं बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे साहेब आणि कुठं त्यांच्या नावावर पदे घेऊन दोन नंबर धंदे करणारे ?
- ही क्लिप आहे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे व शरद पवार गटाचा भामटा गल्ली पुढारी अज्ञात व्यक्ती तो कोण आहे.?

### पंकजा मुंडेंचा पराभव समर्थकांच्या जिव्हारी

बीडमध्ये बजरंग सोनवणेंकडून पंकजा मुंडेंचा ६ हजार मतांनी पराभव झाला. मुंडेंचा तो पराभव मुंडे समर्थकांच्या चांगलाच जिव्हारी लागल्याचं पाहायला मिळालं. कारण, पंकजा मुंडेंच्या पराभवानंतर जिल्ह्यात काही ठिकाणी आत्महत्याच्या घटना घडल्या. तर, पंकजा मुंडेंसंदर्भात आक्षेपार्ह पोस्ट टाकल्यामुळे बीड जिल्ह्यातील अनेक तालुक्यात बंद पुकारण्यात आला होता. पंकजाताई मुंडे यांनी कुंडलिक खांडे यांना सख्या भावापेक्षाही जास्त जीव लावला होता परंतु पुंडलिक खाण्याने पंकजाताई मुंडे यांचा विश्वास तोडल्यामुळे समर्थकांमध्ये पंकजा ताई मुंडे यांच्या विरोधात काम केल्यामुळे पुण्यत खांडे यांच्या विरोधात सर्व पंकजाताई मुंडे समर्थक हे आक्रमक झालेले आहेत तर या अगोदर सुद्धा अनेकदा पंकजाताई मुंडे यांच्या विरोधामध्ये सोशल मीडिया वरती पोस्ट करणाऱ्यांवर आणि वेगवेगळ्या पाथर्डी, शिरुर, परळीसह विविध ठिकाणी बंद पुकारत पंकजा मुंडेंविरुद्धच्या पोस्टच्या अनुषंगाने निषेधही व्यक्त करण्यात आला आहे.

तर आता कुंडलिक खाडे यांचे राजकीय विरोधक आता पद काढण्यासाठी मुबईत तळ ठोकून कुंडलिक खांडे हे शिवसेनेचे शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे पद काढण्यासाठी मुंबईमध्ये त्यांच्याच पक्षातील काही लोक मुबईत असल्याचे चर्चा बीड शहरांमध्ये जोर धरू लागली आहे. कुडलिक खांडे यांचं पद आता गेल्यात जमा असल्याचीही चर्चा रंगू लागली आहे. परंतुकुडलिक खांडे हे पावसाळी अधिवेशन असल्यामुळे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी गेल्या दोन चार दिवसापासून मुंबई येथेच तळ असल्याची ही चर्चा यावेळी लोकांकडून ऐकायला मिळत आहे.

बीड/प्रतिनिधी

बीड लोकसभा २०२४ जातीच्या राजकारणाला इतिहासामध्ये काळा अक्षरांमध्ये नोंद झालेली आहे. बीड जिल्हा लोकसभेची निवडणूक या निवडणुकीत मराठा ओबीसी वाद आला अनेक कारणे पुढे आरोप प्रत्यारोपाच्या पहिली झाल्यानंतर वेगवेगळ्या समाजामध्ये आधीच जातीचे विष पेरलेलं यातच जातियतेढ निर्माण झालेलं असताना आता एका ऑडिओ क्लिप मध्ये शिवसेनेचे शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष कुंडलिक खांडे यांच्या आवाजात चे रेकॉर्डिंग व्हायरस झालेले आहेत

या संवादात कुंडलिक खाडेनी २०२४ बीड लोकसभा निवडणुकीत स्पष्टपणे बजरंग सोनवणेना ३७६ बूथ वर यंत्रणा दिली, मतदान मिळवून दिले आणि पैसे सुद्धा पुरवले असे स्पष्ट कबुल करत आहे.

त्यापुढे जाऊन हे दोघे कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या गाड्या फोडण्याची व त्यांच्यावर हल्ले करून शरद पवारांच्या पक्षाला मते कशी मिळवून द्यायची याची प्लॅनिंग सुद्धा करत आहेत. यामध्ये कुंडलिक खांडे यांच्यासोबत संवाद करणारा तो राष्ट्रवादीचा नेता कोण आहे याचीही सखोल चौकशी होण्याची गरज आहे. कारण याच राष्ट्रवादीच्या नेत्यांनी कुंडलिक खांडडेची क्लिप व्हायरल करून कुंडलिक खांडेंची राजकीय आयुष्य संपवण्याची तयारी अगोदरपासून चालू होतीका? कुंडलीक खांडे यांना फसविण्यासाठी शरद पवार गटाच्या याच नेत्याने ही व्हिडिओ क्लिप काढली होती का याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. कारण यावेळी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या गाडीवर हल्ला करून धनंजय मुंडे यांची गाडी तोडफोड करून हल्ला करण्याचा प्रयत्न आहे. यावेळी मात्र धनंजय मुंडे यांच्या विरोधात काय काय कट शिजत होते का हे पाहणे गरजेचे आहे.

# अन त्या शेतकऱ्याला धनंजय मुंडेंनी दिली बैलजोडी...!

## बैलांच्या जागी मुलांना कोळप्याला जुंपले होते; धनंजय मुंडेंनी हिंगोलीच्या त्या शेतकऱ्यास बांधावर पोहोच केली बैलजोडी

### 'साम' टीव्हीच्या वृत्ताची कृषिमंत्र्यांकडून दखल

मुंबई । प्रतिनिधी

शेतात हळद लावण्यापूर्वी कोळपे वापरून सरी काढण्यासाठी आपल्याकडे बैल जोडी नाही म्हणून भावाला व आपल्या मुलाला कोळप्याला जुंपणाऱ्या हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी बालाजी पुंडगे यांना आज त्यांच्या बांधावर कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी बैल जोडी भेट पाठवली आहे.

हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्याच्या शिरळे गावातील बालाजी पुंडगे या शेतकऱ्याला दोन एकर शेती आहे. पण दोन एकर शेतीसाठी बैल जोडी घेणे परवडत नाही आणि ऐन वेळेला कोणी बैल देत नाही म्हणून पावसाच्या भीतीने हळद लावण्यापूर्वी घाई गडबडीत सरी काढण्यासाठी शेतकऱ्याने स्वतःच्या भावाला व मुलाला चक्क कोळप्याला जुंपले होते. ही घटना दोन दिवसांपूर्वी घडली होती व या शेतकऱ्याला मदत करण्याच्या संदर्भात साम टीव्ही या वृत्तवाहिनीने वृत्त प्रदर्शित केले होते.

या वृत्ताची दखल घेत धनंजय मुंडे यांनी कृषी विभागाचे अधिकारी व हिंगोली जिल्ह्यातील आपले सहकारी यांच्या मदतीने या शेतकऱ्याच्या संदर्भातील संपूर्ण माहिती जाणून घेतली. त्यानंतर



### कृषी विभागाकडून लवकरच ट्रॅक्टरही देणार – मुंडेंनी शेतकरी बालाजी पुंडगे यांना अर्ज करण्यास सांगितले

आज धनंजय मुंडे यांच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हिंगोली जिल्ह्याचे अध्यक्ष बी.डी. बांगर हे थेट बैलजोडी घेऊन बालाजी पुंडगे यांच्या शेतात पोहोचले. पुंडगे परिवाराच्या आनंदाला यावेळी सीमा उरली नव्हती. दरम्यान धनंजय मुंडे यांनी बालाजी पुंडगे यांच्याशी दूरध्वनीवरून संवादही साधला, यावेळी धनंजय मुंडे यांनी आपण बैल जोडी पाठवत असून शेतातील कामांसाठी आपण कृषी विभागाकडे संबंधित योजनेतून ट्रॅक्टर साठी देखील अर्ज करावा, असे बालाजी पुंडगे यांना म्हटले. तर बालाजी पुंडगे यांनी सुद्धा आपल्या शेताबरोबरच इतरांच्या शेतामध्ये सुद्धा काम करून आपण या बैलजोडीचा सांभाळ करू; असा शब्द धनंजय मुंडे यांना दिला. यावेळी बी.डी.बांगर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कृषी विभागाचे अधिकारी हे शिरळे गावात उपस्थित होते.

# छत्रपती राजर्षीशाहू महाराज यांना जयंतीदिनी भारतीय काँग्रेसच्या वतीने अभिवादन

## सामाजिक स्थिरता येण्यासाठी राजर्षीशाहू महाराजांच्या विचारांची गरज - दत्ता कांबळे



माजलगाव (प्रतिनिधी)
आरक्षणाचे जनक छत्रपती राजर्षीशाहू महाराज यांच्या जयंती निमित्त भारतीय काँग्रेस अनु. जाती विभागाच्या वतीने विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वात छत्रपती राजर्षीशाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणासाठी व मुखनायक या वृत्तपत्रासाठी सहकार्य करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विधवत्तेचा सन्मान केला. तसेच १८९४ मधील त्यांच्या राज्याभिषेकापासून ते १९२२ मध्ये त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी राज्यातील मागास जातींतील लोकांसाठी काम केले. जात-पंथाची पर्वा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य होते. त्या काळाच्या तुलनेत ही प्रचंड विरोध झूगारून छत्रपती राजर्षीशाहू महाराजांनी सामाजिक न्यायाची भूमिका पार पाडली, त्याच धर्तीवर वर्तमाणात सामाजिक सलोखा जपण्यासाठी छत्रपती राजर्षीशाहू महाराजांची सामाजिक न्यायायची समानता येण्यासाठी व सामाजिक स्थिरता येण्यासाठी वर्तमानात छत्रपती राजर्षीशाहू महाराजांच्या विचाराची गरज असल्याचे भारतीय काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे आवाहन केले आहे. यावेळी भारतीय काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे सह मानवी हक्क अभियानचे मधुकर कांबळे, युवराज डोईफोडे,अंशीराम कांबळे,अशोक शिंदे, बंडू खंडागळे, धुराजी कांबळे, अनिकेत कांबळे सह काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

# बीड शहाजनपुर बस सेवा कधी धावणार

## महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींची गैरसोय. आगार व्यवस्थापकांचे दुर्लक्ष. लवकरात लवकर बस सेवा चालू करा. बाळासाहेब सोलंकर

बीड । प्रतिनिधि
गेवराई तालुक्यातील शहाजनपुर (चकला)बस सेवा चालू करण्यात यावी. यासाठी अनेक वेळा निवेदन देऊन सुद्धा याची दखल घेतलेली नाही. या संदर्भात पाठपुरावा केलेला आहे. आगर व्यवस्थापकांनी दखल घेतलेली नाही. आता शाळा ,महाविद्यालय या ठिकाणी जाण्यासाठी अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी बस पासून वंचित आहेत. या संदर्भात तात्काळ बस सेवा चालू करण्यात यावी अशी मागणी. गेवराई येथील सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सोलंकर यांनी केली आहे.



# माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम घेऊन साजरा



बीड । प्रतिनिधी
चाळीस वर्ष भारतीय सैन्यात सेवा बजावल्यानंतर माजी सैनिक प्रकाश वाघमारे निवृत्तीच्या नंतरही आपला समाजसेवेचा वसा कायम ठेवला आहे.समाज हिताचे प्रश्न घेऊन वेळोवेळी आंदोलने, धरणे उपोषणे केली आहे. समाज हिताच्या चळवळीत साठी योगदान देत आहेत.त्यांनी देश सेवेनंतर समाजसेवेचे वृत्त हातीती घेतले आहे. समाजाप्रती आपण काही तरी चांगलं करायचं आहे ही भावना कायम. माजी सैनिका प्रकाश वाघमारे यांनी त्यांचा वाढदिवस आगळ्यावेगळ्या प्रकारे साजरा केला .वासनवाडी परिसरात असलेल्या रामगड येथील आदिवासी समीकरणे येथील अनाथ बालकासमवेत आपला वाढदिवस साजरा केला.अनाथ, निराधार, वंचित उपेक्षित मुला मुलींसाठी एक महिना पुरेल एवढे किराणा सामान त्यांनी यावेळी भेट दिली.सहकुटुंब सहभागी होऊन परिसरामध्ये वृक्षारोपणही केले. एक आगळावेगळा उपक्रम राबवला. यावेळी त्यांनी असे सांगितले की महापुरुषांचे अनुकरण करून मुलांनीही मोठे बनाव व जिल्ह्याचं व आदिवासी समीकरण गुरुकुल च नाव मोठं करावं तसेच यावेळी त्यांनी पालकांना व संचालकांना असेही ग्वाही दिली की वेळोवेळी जर कसल्याही प्रकारे मदत लागली तर मी मदत करणार आणि येणाऱ्या काळामध्ये अशाच पद्धतीने सामाजिक उपक्रम राबवत राहणार आहेत. सत्कारास उत्तर देताना माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी म्हटले यावेळी त्यांच्यासमवेत त्यांचे कुटुंबातील सर्वसदस्य, संपादक बालाजी जगतकर संपादक गणेश शिंदे व आदिवासी समीकरणाचे सुधीर भोसले,मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युगप्रवर्तक राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक क्रांतीसह शैक्षणिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली - प्रा.दिलीप चव्हाण यांचे प्रतिपादन

## तुलसी महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त व्याख्यान



बीड । प्रतिनिधि
युगप्रवर्तक राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक क्रांतीसह शैक्षणिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली असे प्रतिपादन प्रा.दिलीप चव्हाण यांनी केले. तसेच मानवी जीवनाचा दर्जा, साक्षरता, कामाचा दर्जा यासह मराठवाड्याची सध्याची परिस्थिती आणि उद्योग व्यवसाय यावर भाष्य करत आपले मत व्यक्त केले. राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त संचालक, स्कूल ऑफ लँग्वेज लिटरेचर आणि सांस्कृतिक अभ्यास एस. आर. टी. एम. विद्यापीठ नांदेड प्रा.दिलीप चव्हाण यांच्या व्याख्यानाचे आयोजन दिनांक २६ जून २०२४ रोजी सकाळी ११ वाजता देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने करण्यात आले होते.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठान बीड संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे यांची उपस्थिती होती. यावेळी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड प्राचार्य प्रा.डॉ.एल.एम. थोरात, उपप्राचार्य प्रा. डी.जी. निकाळजे, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड प्राचार्य प्रो.डॉ.अशोक धुलधुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना प्रा. दिलीप चव्हाण म्हणाले की, शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती, वसतिगृह काढले तसेच तत्कालीन अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश काढून समानतेचा संदेश दिला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्यांना शैक्षणिक सवलत म्हणून फी माफीचा निर्णय घेतला. कोल्हापूर संस्थानातील मागासलेल्या जातींच्या विद्यार्थ्यांना फी माफी आणि मोफत शिक्षण उपलब्ध करून दिले राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच वेदोक्त प्रकरण आणि शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानगाव येथील परिषदेतील काही महत्त्वपूर्ण प्रसंग सांगितले. अध्यक्षीय भाषणामध्ये प्रा.प्रदिप रोडे यांनी शाहू महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टाकला आणि तुलसी शैक्षणिक समूहाच्या माध्यमातून महापुरुषांच्या विचारांची पेरणी केली जाते असे सांगत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तुलसी शैक्षणिक समूह परिश्रम घेत आहे असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर वाघमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.योगिता लांडगे यांनी मानले.

# धारूर शहरात राजश्री शाहू महाराज जंयती विवीध सामाजीक उपक्रम राबवुन साजरी



किल्ले धारूर । प्रतिनिधि
धारूर शहरात छत्रपती राजश्री शाहू महाराज जयंती उत्सव समितीचे वतीने विवीध सामाजीक उपक्रम राबवून शहरात राजश्री शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.या सर्व उपक्रमाना उस्फुर्त प्रतीसाद मिळाला .धारूर शहरात राजश्री शाहु महाराज जयंती उत्सव समितीचे वतीने प्रतीवर्षी विवीध सामाजीक उपक्रमाचे आयोजन करून राजश्री शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली राजश्री शाहू महाराज चौकात काँग्रेस आय चे जेष्ठ नेते प्रभाकरराव चव्हान यांचे हस्ते भगव्या ध्वजारोहण करण्यात आले येथे उपस्थित मान्यवराचे हस्ते प्रतीमापुजन करण्यात आले.त्या नंतर हुतात्मा स्मारका मध्ये रक्तदान शिबीराचा शुभारंभ करण्यात आला या शिबीराला उस्फुर्त प्रतीसाद मिळाला. त्यानंतर जि. प माध्यमिक शाळा धारूर येथे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहीत्याचे वितरण करण्यात आले.यावेळी. काग्रेसचे जेष्ठनेते प्रभाकरराव चव्हाण, नगरसेवक बालाजी चव्हाण राजमूद्राचे सुरेशबप्पा शेळके, राष्ट्रवादी कांग्रेस चे शहराध्यक्ष नितीन शिनगारे पत्रकार अतुल शिनगारे, शिवसेनेचे तालूका प्रमुख बाळासाहेब कुरूंद, सुरेश गवळी ऍड.मोहन भोसले, रोहीत गायकवाड, धंनजय कुलकर्णी बलभिम मुंडे, राधाकृष्ण गवळी,बाबा सराफ जि. प.मा.शा मुख्याध्यापक जी.के आकुसकर ज्ञानेश्वर शिंदे आदी मान्यवराची उपस्थीती होती. हे सर्व कार्यक्रम उत्साहात यशस्वी करण्या साठी उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष बंडोबा सावंत उत्सव समिती अध्यक्ष शरद सांवत आदीनी परीश्रम घेतले

# छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त ऑल इंडिया पँथर सेना बीड च्यावतीने विविध उपक्रम राबवून जयंती साजरी



राजर्षी शाहू छत्रपती महाराज महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्रांतीचे अग्रदूत आहेत. जातीय विषमते विरूध्द व उच्चनीचते विरूध्द बंड पुकारून सामाजिक समता स्थापन करणारा लोककल्याणकारी राजा..!महाराष्ट्राच्या समाजिक चळवळीचे नेतृत्व स्वीकारून पददलित समाजाला जागे करून त्यांच्यामध्ये स्वाभिमानाची ज्योत पेटवण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्यही त्यांनीच केले. महाराष्ट्राला मार्गदर्शन करत असतानाच तत्कालीन कोल्हापूर राज्याचा सर्वांगीण विकास या महामानवाने घडविला. राजर्षी शाहू छत्रपती महाराजांच्याच काळात प्राथमिक शिक्षण घराघरात गेले. उद्योगधंद्यांना भरभराट आली. नवनवीन पेठा वसविण्यात आल्या. शेती व्यवसायाच्या विकासावर आपली आर्थिक प्रगती आहे हे जाणून शेती व्यवसायास उद्योगीकरणाची जोड दिली, तरच आपली चांगली प्रगती होईल असा विचार ते सातत्याने बोलून दाखवत असत. यासाठी शेतीपूरक व्यवसायांना चालना देण्यासाठी महाराजांचे सदैव प्रयत्न असत.

कला व क्रीडागुणांची जोपासना होणे आवश्यक आहे, हे ओळखून कलावंतांना, चित्रकारांना, संगीततज्ज्ञांना, शाहिरांना व मल्लांना त्यांनी राजाश्रय दिला.राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या राजर्षी शाहू छत्रपती महाराजांना जयंती दिनी त्रिवार मुजरा !ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने बीड शहरांमध्ये जिव्हाळा बेघर निवारा आश्रम या ठिकाणी अन्नदान व वृक्षरोपण करून जयंती साजरी केली तसेच बेगर अनाथ विद्यार्थ्यांना पसायदान सेवा प्रकल्प या ठिकाणी शालेय साहित्य वाटप करण्यात आली. यावेळी उपस्थित ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, रोशन धिवार, राजेश चव्हाण, आकाश देवकते पाटील, मधुसूदन मस्के पाटील, सुरज सोनवणे व संघटनेतील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.



आज दिनांक२५/६/२४ रोजी संपूर्ण महाराष्ट्राची कुलस्वामिनी असलेल्या अंबाजोगाईच्या श्री योगेश्वरी देवीच्या विश्वस्त मंडळाची मुदत संपल्यामुळे नवीन विश्वस्त मंडळ भावीका मधून निवड करण्याचे आदेश माननीय सहाय्यक धर्मदाय आयुक्त बीड यांना दिलेले असताना सुद्धा सदर निवड झालेल्या विश्वस्तांची यादी उघड झालेले आहे निवड केलेल्या सोळा विश्वासात पैकी चार ते पाच विश्वस्त हे अंबाजोगाई शाहीरा बाहेरील असून त्यांचे अन्य गावाच्या मतदार यादी मध्ये नाव नोंद आहेत निवड करण्यात आलेल्या विश्वस्तांमध्ये योगेश्वरी देवीची निगडित पारंपारिक सेवा करणारा पुजारी पुरोहित पालखी वाहणारे मानकरी भोई समाज बलुतेदार पैकी एकही सदस्य या निवडून आलेल्या १६ सदस्यांमध्ये नसल्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व लोक जनशक्ती पार्टी व भीमशक्तीच्या वतीने आज सह धर्मादाय आयुक्त लातूर यांना निवेदन देण्यात आले व झालेल्या अर्थपूर्ण निवडी या रद्द करण्यात याव्या बडतर्फ करण्यात यावे अन्यथा प्रचंड प्रमाणात जनआंदोलन छेडण्यात येईल असा इशारा संबंधित पक्षाच्या वतीने देण्यात आला.

# संपूर्ण क्रांती आणण्या साठीच आझाद क्रांती सेनेचा जन्म :- सेना प्रमुख राजेश घोडे



माजलगाव (प्रतिनिधी)
दिनांक २६ जून २०२४ रोजी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने माजलगाव हॉटेल व्यंकटेश येथे आझाद क्रांती सेना स्थापननेची घोषणा पत्रकार परिषद घेऊन सेना प्रमुख राजेश घोडे सेनेचे महासचिव कडोदास कांबळे तसेच आंबेडकरी चळवळीतील नेते एडवोकेट अरुण जाधव मा राजेशजी क्षीरसागर मा रघुनाथ दादा शिंदे मा संदीप जी दात्रे यांनी केली स्थापना झाल्यानंतर पुढे गाव, तालुका, जिल्हा, व महाराष्ट्र, कार्यकारणी लवकरात लवकर घोषित करण्यात येईल असेही या पत्रकार परिषदेमध्ये राजेश घोडे यांनी सांगितले या आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख म्हणून राजेश घोडे व तसेच विचार मंचावर सेनेचे महासचिव मा कडूदासजी कांबळे अँड अरुणजी जाधव मा राजेश क्षीरसागर मा रघुनाथजी शिंदे मा संदीपजी दात्रे हे या पत्रकार परिषदेला उपस्थित होते पत्रकार परिषद संपन्न झाल्याच्या नंतर आलेल्या तरुण कार्यकर्त्यांना सेना प्रमुख राजेश घोडे सह वरील संपूर्ण चळवळीतील नेत्यांनी मार्गदर्शन केले याप्रसंगी बोलताना राजेश घोडे म्हणाले की मुझे संपूर्ण क्रांती चाहिये आणि या देशांमध्ये संपूर्ण क्रांती आणण्यासाठीच आझाद क्रांती सेनेचा जन्म झालेला आहे २६ जानेवारी १९४९ रोजी आम्हाला राजकीय लोकशाही मिळाली परंतु अजून इथल्या उपेक्षित वंचित विस्थापित समूहाला सामाजिक आर्थिक लोकशाही मिळणं बाकी आहे म्हणून या देशांमध्ये आम्हाला सामाजिक आर्थिक राजकीय शैक्षणिक क्रांती आणि बदल घडवून आणण्यासाठी ही आझाद क्रांती सेना भविष्यात व्यापक स्वरूपाचा लढा गावापासून ते दिल्लीच्या तक्तापर्यंत उभा करणार आहे तेव्हा त्यासाठीच या आझाद क्रांती सेनेचा जन्म झाला आहे या स्थापना प्रसंगी आझाद क्रांती सेनेचे तरुण तडफदार सैनिक उपस्थित होते हॉलमध्ये आझाद क्रांती सेनेच्या जयघोषाने सभागृह दणाणून गेले याप्रसंगी आलेल्या तरुण सैनिकाला आझाद क्रांती सेना पुढे घेऊन जाण्यासाठी शुभेच्छा तुकाराम जी शिंदे यांनी देऊन आभार मानले

# शेतात खुरपणी करत असताना वीज पडून एकाच गावातील तीन महिलांचा मृत्यू

## गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील दुर्दैवी घटना; गावात शोककळा

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : चकलांबा परिसरात शेतात खुरपणी करत असताना अचानक वादळ वारे आले. सोबतच विजांचा कडकडाट झाला. यामध्ये एक वीज अंगावर कोसळल्याने चार महिला भाजल्या. त्यातील तीन महिलांचा जिल्हा रूग्णालयात नेत असताना मृत्यू झाला तर भाजलेल्या एका महिलेवर उपचार सुरू आहेत. ही घटना गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे बुधवार दि.२६ रोजी सायंकाळी घडली आहे. शालनबाई शेषेराव नजन (वय ६५), लंका हरिभाऊ नजन (वय ४५) आणि विजया राधाकिसन खेडकर (वय ४६ सर्व रा.चकलांबा ता.गेवराई) अशी मयत महिलांची नावे आहेत. तर यमुना माणिक खेडकर (वय ७५) या भाजल्या असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या सर्व महिला हरिभाऊ नजन यांच्या शेतात बुधवारी खुरपणी करण्यासाठी गेल्या होत्या. सायंकाळच्या सुमारास अचानक वादळ वाऱ्यासह पाऊस झाला. विजेचा कडकडाटही झाला. यावेळी शेतात असलेल्या या चार महिलांच्या अंगावर वीज कोसळली. हा प्रकार परिसरातील लोकांनी पाहिला. त्यांनी तातडीने या महिलांकडे धाव घेत या सर्वांना जिल्हा रूग्णालयात हलविले. परंतू बीडमध्ये येईपर्यंतच तीन महिलांचा मृत्यू झाला. तर भाजलेल्या यमुना खेडकर यांच्यावर जिल्हा रूग्णालयात उपचार सुरू आहेत.



नातेवाईकांचा आक्रोश..

घटनेची माहिती मिळताच मयतांच्या कुटूंबियांसह नातेवाईक, चकलांबा ग्रामस्थांनी जिल्हा रूग्णालयात धाव घेतली.



## महान समाजसुधारक आरक्षणाचे जनक लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांची १५० वी जयंती उत्साहात साजरी..

बलभीम नगर बुद्ध विहार संघर्ष समिती शिवाजीनगर पालवण रोड बीड येथे लोककल्याणकारी लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरा , या कार्यक्रमात अंजली तेजस वडमारे यांच्याकडून फळ वाटप करण्यात आले या कार्यक्रमास ड तेजस वडमारे अंजली तेजस वडमारे, अंजली विशाल वाघमारे, आर्यन साळवे अंकुश जाधव, निवृत्ती वाघमारे तसेच बलभीम नगर, मित्र नगर ,दिलीप नगर या भागातील सर्व महीला व समाज बांधव सहपरिवार या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

## गेवराई तालुक्यात वीज कोसळून मृत झालेल्या महिलांच्या निधनाबद्दल पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले दु:ख व्यक्त

मदत व पुनर्वसन विभागाकडून मयत महिलांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याच्या दिल्या सूचना

मुंबई - बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील चकलांबा गावातील ३ महिलांचे आज शेतात काम करत असताना वीज कोसळून दुर्दैवी निधन झाले होते. या दुर्दैवी घटनेबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दु:ख व्यक्त केले असून, या माऊलींच्या कुटुंबियांच्या दु:खात आपण सहभागी असल्याचे म्हटले आहे. आज दुपारी शेतात काम करत असताना अचानक वीज कोसळून ही दुर्घटना घडली होती. यामध्ये तीन महिलांचा दुर्दैवी अंत झाला असून, एक महिला सध्या रुग्णालयात उपचार घेत आहे.

दरम्यान जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी व जिल्हा प्रशासनाशी धनंजय मुंडे यांनी याबाबत चर्चा केली असून, संबंधित महिलांच्या कुटुंबियांना शासकीय नियमाप्रमाणे तातडीची मदत मिळवून देण्याबाबत प्रशासनास सूचना दिल्या आहेत.




निमसाखर एज्युकेशन सोसायटीचे, एन. ई.एस. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय निमसाखर तालुका इंदापूर जिल्हा पुणे, येथे आज छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची १५० वी जयंती उत्साहात साजरा करण्यात आली. त्यावेळी यशवंत विविध कार्यकारी सहकारी विकास सोसायटीचे विद्यमान चेअरमन, आदरणीय नंदकुमार सूर्यकांत रणवरे पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यावेळी सन्माननीय प्राचार्य चंद्रकांत रणवरे सर पर्यवेक्षक मधुकर खरात सर , कनिष्ठ महाविद्यालयाचे विभाग प्रमुख चंद्रकांत बोंद्रे सर सचिन रणवरे सर यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्था सचिव धनंजय सूर्यकांत रणवरे त्यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या जयंती निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. आपण सर्वांनी महापुरुषांचे विचार आत्मसात केले पाहिजे असेही मत त्यांनी व्यक्त केले. मधुकर खरात सर, सोमनाथ चौधरी सर यांनी विद्यार्थ्यांना शाहू महाराजांचे व्यक्तिमत्व ,विचारधारा याबद्दलची माहिती पटवून दिली. प्रमोद चव्हाण सर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सांस्कृतिक विभागाने कार्यक्रमाचे आयोजन केले.

# विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजनात १५ आरोग्यदायी पदार्थांचा समावेश फक्त कागदावरच

## मोफत गणवेश मिळणार कधी?!:- गोकुळ सानप,रायमोहाकर

शिरुरकासार (प्रशांत बाफना)

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन पोषण आहारामध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या १५ पाककृती निश्चित करण्यात आल्या असुन ३ संरचित आहार पद्धती नुसार व्हेजिटेबल पुलाव, नाचणी सत्त्व,अंडा पुलाव,तांदळाची खिचडी अशा पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची खिचडीपासुन सुटका होणार असुन निश्चित केलेल्या पाककृती मध्ये व्हेजिटेबल पुलाव,अंडा पुलाव,मसाले भात,मोड आलेली मटकीची उसळ, मटार पुलाव,गोड खिचडी,मुगडाळ, खिचडी,चवळी खिचडी,मुग,शेवगा,वरण भात,तांदळाची खीर,चणा पुलाव, नाचणीचे सत्त्व, सोयाबीन पुलाव,मोड आलेले कडधान्य आदी.१५ पदार्थांचा आस्वाद घेता येणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात येत आहे मात्र वस्तुस्थिती वेगळीच असुन सद्यस्थितीत तांदळापासून बनविलेल्या पाककृतीच्या स्वरूपात पोषण आहार दिला जात आहे. शालेय पोषण आहार पुरवठादार महाग वस्तुंची कमतरता दाखवून स्वस्त असणा-या मटकी, हरभरा,वाटाणा, मसुर,मुगदाळ यांचाच शाळांना पुरवठा करण्यात येत आहे.केंद्र शासनाने दिलेल्या सुचनेनुसार विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहारामध्ये स्थानिक पातळीवर उपलब्ध अन्नधान्य, तृणधान्य व अन्य पदार्थांचा समावेश करून आहाराचा दर्जा आणि पौष्टिकता वाढविणे, आहारात वैविध्य आणण्यासाठी पाककृती सुधारणा समिती नियुक्त करण्यात आली होती.

शिक्षण विभागाकडून पात्र शाळांमध्ये निर्माण केल्या जात असलेल्या परसबागातुन उत्पादीत भाजीपाला,फळे यांचा समावेश विद्यार्थ्यांच्या आहारात होत असल्याने विद्यार्थ्यांना ताजा,सकस आहार मिळण्यास मदत होत असल्याचे नमूद केले आहे. मात्र जिल्ह्यातील किती शाळांमध्ये परसबाग आहे आणि मुख्य म्हणजे उन्हाळ्यात विद्यार्थ्यांना प्यायला पाणी नाही आणि परसबाग कशी जगवायची असा प्रश्न शाळेतील शिक्षकांनी उपस्थित केला असुन केवळ कागदावर छान असणारी योजना वास्तवात मात्र उतरताना दिसत नाही.

मोफत गणवेश आणि बुट सॉक्स मिळणार कधी???

राज्यात एक राज्य एक गणवेश योजनेची अंमलबजावणी २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येत असून या अंतर्गत शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इयत्ता पहिली ते आठवी सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला असुन यामध्ये एक नियमित स्वरुपाचा गणवेश तर स्काऊट व गाईड या विषयासाठी दुसरा गणवेश असणार आहे.महिला आर्थिक विकास महामंडळाकडून गणवेशाच्या शिलाईचे काम सुरू असुन लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात येत असली तरी नेमका गणवेश मिळणार कधी?? हा प्रश्न पालकांनी उपस्थित केला आहे.गणवेशा बरोबरच मुलांना बुट आणि सॉक्स सुद्धा मिळाले नाहीत.गतवर्षी एका विद्यार्थ्यांसाठी एक बुट जोडी आणि दोन सॉक्स जोड यासाठी १७० रूपये निधी देण्यात आला होता.यावरुन कोणत्या दर्जाचे साहित्य मिळत असेल याची कल्पनाच न केलेली बरी.



नवगण राजुरी:-साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरी करण्यात आली .यावेळी मुख्याध्यापक पवळ पी .एस. पर्यवेक्षक काळे जे. एम.सर्व शिक्षक उपस्थित होते.



## अमली पदार्थांचे सेवन आरोग्यासाठी व कुटुंबासाठी घातक- रवींद्र शिंदे

बीड । प्रतिनिधी

समाज कल्याण अधिकारी कार्यालय जि प बीड ,राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान वासनवाडी ता.जी. बीड ,व नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अंमली पदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त अंथरवन पिंपरी तांडा वस्ती येथील आश्रम शाळेमध्ये जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रवींद्र शिंदे समाज कल्याण अधिकारी जि. प. बीड ,अशोक तांगडे, अध्यक्ष बालकल्याण समिती बीड ,तत्त्वशील कांबळे सामाजिक कार्यकर्ते तथा जिल्हा संघटक नशाबंदी मंडळ बीड, मिथुन जोगदंड ,आश्रम शाळेचे मुख्याध्यापक डी.ए .शिंदे, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य एम. आर.खंदारे शाळेचे शिक्षक व कर्मचारी वृंद विचार मंचावर उपस्थित होते.सर्वप्रथम राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि प बीड रवींद्र शिंदे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, अमली पदार्थांचे सेवन हे आपल्या आरोग्यासाठी व कुटुंबासाठी घातक आहे. यामुळे वेगवेगळे आजार आपणास जडत आहेत. व्यसनामुळे कुटुंबाचा ऱ्हास होत आहे. आपण कमावलेल्या पैशाचा ही त्यातून नाश होतो. अंमली पदार्थांच्या सेवनामुळे युवकांची दिशा बदलत आहे अंमली पदार्थ सेवनाची एकदा सवय लागल्यानंतर ती लवकर सुटत नाही. त्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. त्यामुळे युवकांनी व किशोरवयीन बालकांनी या सर्व गोष्टी पासून दूर राहावे. आपले शरीर निरोगी ठेवावे. असे विचार रविंद्र शिंदे यांनी व्यक्त केले

कार्यक्रमात तत्त्वशील कांबळे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, अंमली पदार्थ ही आता खूप मोठी समस्या निर्माण झालेली आहे महानगर असो किंवा ग्रामीण भागात अमली पदार्थांच्या व्यसनांचे पदार्थ पोहोचलेले आहेत. या अशा प्रकारच्या नशा मुळे युवकांचे मनोधैर्य खचत असून ते व्यसनाच्या विळख्यात अडकून स्वतःची जीवन बरबाद करत आहेत. त्यामुळे हे व्यसन आपल्याला लागू नये याकरिता आपण आपल्या जीवनात चांगले मित्र मैत्रिणी कराव्या जे व्यसना पासून लांब आहेत. अशांसोबत राहावे. कुणी कितीही बळजबरी केली तरी व्यसनाच्या आहारी जाऊ नये. एकदा जर अमली पदार्थ व्यसनाची चटक लागली तर संपूर्ण आयुष्य बरबाद होते.

# ऐतिहासिक भव्य अश्व रिंगण सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात

स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा

अंबाजोगाई येथे गेल्या अनेक वर्षापासून आयोजित करण्यात येणाऱ्या संतश्रेष्ठ नामदेव महाराज तसेच संतश्रेष्ठ जनाबाई आणि इतर पालख्यांचा भव्य अश्वरिंगण सोहळा शनिवार दिनांक ६ जुलै २०२४ रोजी आयोजित करण्यात आला असून या अश्वरिंगण सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. या सोहळ्याचा आनंद या पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन संयोजक व स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी केले आहे.




अशा प्रकारचा अश्वरिंगण सोहळा मराठवाड्यामध्ये आषाढी यात्रेनिमित्त संपन्न होणारा हा पहिलाच गोल अश्व रिंगण सोहळा आहे. याशिवाय रिंगण सोहळ्याला एक वेगळी पार्श्वभूमी आहे. हा सोहळा नसून वारकरी संप्रदायातील श्रेष्ठ अशा गुरु- शिष्यांच्या भेटीचा योग आहे. भागवत संप्रदायामध्ये आद्य अभंग रचयीता म्हणून संत श्रेष्ठ नामदेव महाराजांची ओळख आहे. संत श्रेष्ठ नामदेव महाराजांनी भागवत धर्माची पताका सर्वदूर पसरवली. अखंड भारतामध्ये संतश्रेष्ठ नामदेव महाराजांनी भागवत धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी अखंडितपणे काम केलं. शीख धर्मातील सर्वश्रेष्ठ गुरु ग्रंथसाहिब या ग्रंथामध्ये संत श्रेष्ठ नामदेव महाराजांच्या रचना समाविष्ट आहेत यावरून त्यांचं थोरपण लक्षात येऊ शकेल. भागवत धर्मामध्ये सर्व जाती-धर्माच्या संतांनी भक्तीचा पाया मजबूत करण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. सर्व बारकऱ्यांचं अधिष्ठान पांडुरंग परमात्मा हाच केवळ श्रेष्ठ असून कर्मकांडाला तिलांजली दिलेली आहे माऊली ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून भगवद्गीतेचा साधा आणि सोपा अर्थ सर्वसामान्य लोकांसाठी खुला केला. माऊलींचे हे कार्य संत श्रेष्ठ नामदेवरायांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून पुढे नेलं. आषाढी वारी निमित्त संत श्रेष्ठ नामदेव महाराजांची पालखी नरसी नामदेव येथून पंढरपूरसाठी प्रस्थान करते तर संत श्रेष्ठ जनाबाई यांची पालखी गंगाखेड येथून पंढरपूरसाठी प्रस्थान करते. या गुरुशिष्यांची पहिली भेट माता योगेश्वरीच अधिष्ठान असणाऱ्या आणि आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांची समाधी असणाऱ्या, दासोपंतांची कर्मभुमी असणाऱ्या अंबाजोगाई या पवित्र भूमीमध्ये होते. या गुरुशिष्यांची भेट घडवून आणण्यासाठीच केवळ अंबाजोगाई येथील अश्व रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात येते अश्व रिंगण सोहळा म्हणजे समस्त वारकरी बांधवांना उत्साह देणारा, पांडुरंग रायाचा भेटीची आस वाढवणारा असा सोहळा होतो. या सोहळ्यामध्ये भजन कीर्तनाची

असतेच परंतु त्यासोबतच वारकऱ्यांचे पाऊल, हमामा, हुतुतु, कबड्डी, कुस्ती असे विविध खेळ सोहळ्यामध्ये आयोजित केले जातात. या दोन्ही पालख्यांचे स्वागत अंबाजोगाईकरांच्या वतीने संत भगवान बाबा चौक याठिकाणी केले जाते.. त्या ठिकाणी अश्व रिंगण सोहळ्यामध्ये आपण सर्वांनी सहभागी व्हावे हे निमंत्रण घेऊन चिचखंडी येल्डा या परिसरातील वारकऱ्यांची दिंडी संत श्रेष्ठ नामदेवरायांच्या पादुकांच्या चरणी लीन होते. संत श्रेष्ठ नामदेवरायांना अश्व रिंगण सोहळ्याचे निमंत्रण दिले जाते आणि मग तेथून सर्व पालख्या विठुनामाचा जयघोष करत अश्व रिंगण सोहळ्यामध्ये सहभागी होण्यासाठी योगेश्वरीच्या मैदानाकडे रवाना होतात. योगेश्वरीचे मैदान प्रतिवर्षी अश्व रिंगण सोहळा पाहण्यासाठी सर्व भाविक भक्तांनी गजबजून गेलेले असते. याची देही याची डोळा हा सोहळा साठवून ठेवण्यासाठी प्रत्येक भाविक भक्तांची धडपड चाललेली असते. अश्व रिंगण सोहळा उत्तरोत्तर संपूर्ण मराठवाड्यामध्ये प्रचलित होत आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी नंदकिशोर मुंदडा यांच्या वतीने बाल वारकरी समूह दिंडी नृत्य स्पर्धेचे आयोजन केलेले असून इयत्ता पहिली ते चौथी पाचवी ते सातवी व आठवी ते दहावी अशा तीन गटांमध्ये या स्पर्धा संपन्न होणार आहेत. प्रत्येक गटातील विजेत्या स्पर्धकांना ३१०१ प्रथम पारितोषक २००१ द्वितीय पारितोषक १०१ तृतीय पारितोषक ५०१ उत्तेजनार्थ पारितोषिक व सर्व विजेत्यांना सन्मान चिन्ह देण्यात येणार आहे याची सर्व स्पर्धकांनी नोंद घ्यावी. उत्कृष्ट नियोजन आणि गुरु-शिष्यांच्या भेटीचा अपूर्व योग यासाठी या सोहळ्याची वेगळी ओळख आहे. सर्व भाविकांनी शनिवार दिनांक ६ जुलै २०२४ रोजी दुपारी १ वा. आयोजित बाल वारकरी वेषभुषा स्पर्धेचा व अश्व रिंगण सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष नंदकीशोर मुंदडा, दिलीप सांगळे, प्रकाश बोरगावकर, बाबा महाराज जवळगावकर, दिलीप गीत्ते, बळीराम चोपणे, अनंत अरसुडे, शशिकांत गायकवाड, शैलेश स्वामी, वैजनाथ देशमुख, प्रशांत अदनाक, महारुद्र शास्त्री खाडे महाराज, हभप किसन महाराज पवार, गोविंद महाराज सुक्रे, अमोल महाराज घोडके यांच्या वतीने करण्यात येत आहे संयोजन समितीतील सर्व सदस्य व वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येत आहे.

## ठाणे, मीरा-भाईंदरमधील अनधिकृत पब, बार आणि अमली पदार्थांशी संबंधित अवैध बांधकामांवर बुलडोझर फिरवावा

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मनपा आयुक्त, पोलिस आयुक्तांना निर्देश

शहराला अमली पदार्थमुक्त करण्यासाठी बेकायदेशीर पब्ज, बारवर कठोर कारवाई करावी

मुंबई : ठाणे आणि मिरा-भाईंदर शहराला अमली पदार्थमुक्त करण्यासाठी शहरातील बेकायदेशीर पब्ज, बारवर कठोर कारवाई करावी. तसेच शहरातील अमली पदार्थांशी निगडित अवैध बांधकामांवर बुलडोझर फिरवून ती नष्ट करण्यात यावीत, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन्ही शहरांचे महापालिका आयुक्त आणि पोलिस आयुक्त यांना आज दिले.

पुण्यात काही तरुण अमली पदार्थांचे सेवन करीत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले होते. याची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी पुणे पोलीस आयुक्त आणि मनपा आयुक्तांना तेथील अमली पदार्थांशी संबंधित अनधिकृत बांधकामे बुलडोझर लावून नष्ट करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर पुणे शहरामध्ये या संदर्भात व्यापक कारवाया करण्यात आल्या. आता तशाच पद्धतीने ठाणे शहर आणि मीरा-भाईंदर शहरातील अमली पदार्थांशी संबंधित अवैध बांधकामे ही बुलडोझर लावून नष्ट करण्यात यावीत, अशा सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिल्या आहेत.

अमली पदार्थामुळे तरुणाईचे मोठे नुकसान होत आहे. हा विळखा तातडीने रोखणे महत्त्वाचे आहे. यासाठी अत्यंत कडक उपाय योजण्यात यावेत. अमली पदार्थ विक्रेत्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरु करावी. शहराला अमली पदार्थमुक्त करण्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय योजावेत, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले आहेत.

## गुरुनानक प्राथमिक विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

दि२६/०६/२०२४ या रोजी गुरुनानक प्राथमिक विद्यालय, शाहूनगर, बीड या शाळेत छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली , जयंती उत्सवाचे अध्यक्ष गुरुनानक प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापीका सन्माननीय पवार मॅडम ह्या होत्या तर प्रमुख मार्गदर्शन म्हणून श्रीमती डोंगरे मॅडम व श्री राजेश गदळे सर हे होते, त्यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले श्रीमती डोंगरे मॅडम यांनी शाहू महाराजाविषयीं सखोल मार्गदर्शन केले तर मार्गदर्शन पर भाषणात श्री राजेश गदळे सर यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा जीवन प्रवास गोष्टी रूपातुन उलगडून सांगीतला व देशासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी केलेले अनमोल कार्य विद्यार्थ्यांना भाषणातुन पटवून सांगितले, या कार्यक्रमाचे अतिशय सुंदर सुत्रसंचालन व



आभार प्रदर्शन सविता मुंडे मॅडम यांनी केले.हा कर्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापीका श्रीमती पवार मॅडम , शाळेतील सहशिक्षक श्री गदळे सर,तांदळे सर,तेलप सर,श्रीमती पव्हणे मॅडम, डोंगरे मॅडम, मुंडे मॅडम, यांनी मोलाचे सहकार्य केले कार्यक्रमाचा समारोप सर्व शिक्षकांना व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून व अल्पोपहार देऊन कर्यक्रमाची सांगता करण्यात आली, यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व चैतन्य ओसांडून वाहात होता.



## श्री चांगदेव विद्यालयाचा गुणगौरव पुरस्कार सोहळा संपन्न

छत्रपती संभाजीनगर (चैताली औटे)

पैठण तालुक्यातील श्री चांगदेव विद्यालय चांगतपुरी प्रशालेच्या शालांत प्रमाणपत्र परीक्षा देणाऱ्या एस.एस.सी.च्या विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने गुणगौरव सत्कार सोहळा साजरा करण्यात आला.उच्च पदावर निवड झालेल्या यशवंत गुणवंत माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्येची देवता सरस्वती माता व महाराष्ट्राचे कुलदैवत आई तुळजाभवानी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. गुणवंत विद्यार्थिनी कुमारी वैष्णवी बाळासाहेब शिंदे, रेश्मा खरात, भवार साक्षी यांच्यासह आदी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला .

विविध उच्च पदावर निवड झालेल्या यशवंत गुणवंतांच्या सोहळ्याचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गणेश नाटकर ,जालिंदर नाटकर, खरात जगदीश, वडघने अविनाश ,हरी नाटकर, संदीपान नाटकर ,दादासाहेब नलभे, प्रवीण खेडेकर, प्रतीक्षा पाखरे ,नाटकर विठाबाई ,नाटकर अश्विनी ,मुक्ता बनगर ,पूजा झारगड सह आदींचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक शिवाजी पवार यांनी केले. प्रास्ताविक मध्ये शाळेची ध्येयधोरणे पुढील शैक्षणिक क्षेत्रामधील नियोजन व शाळेची शिस्त याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी सरपंच साईनाथ होरकटे ,संस्थेचे अध्यक्ष रामनाथ चोरमले ,सचिव सुधीर चोरमले, वैजनाथ मदने, पोलीस पाटील जगन्नाथ माने ,भागिनाथ नाटकर, नितीन मोरे, उपसरपंच शरद झारगड,केंद्र प्रमुख उत्तम खरात, दिलीप थोटे, सुभाष शिंदे, शेषराव नलभे, उत्तमराव नलभे, बाळासाहेब तट्टू, बाबासाहेब होरकटे ,संजय संभाजी वडघणे, चंद्रकांत खरात ,राणी शिंदे ,सरपंच शिवानी पाखरे यांच्या सह विविध क्षेत्रातील मान्यवर पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आषाढी दिंड्यांच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरचे प्रशासन सतर्क

### दिंड्यांच्या मार्गावरील सर्व ढाबे, हॉटेल्समधील अन्नाची होणार नियमित तपासणी

**छत्रपती संभाजीनगर (चैताली औटे)**

**आषाढीनिमित्त जिल्ह्यातून पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंड्यांच्या मार्गावरील सर्व ढाबे, हॉटेल्समधील अन्न नमुन्यांची तपासणी करा, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.जिल्हास्तरीय सुरक्षित अन्न व आरोग्यदायी आहार सल्लागार समितीची बैठक मंगळवारी (२५ जून) जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रविण फुलारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतीपवळे, जिल्हा आरोग्य**



**अधिकारी डॉ. अभय धानोरकर, सहाय्यक आयुक्त अन्न अजित मैत्रे, दयानंद पाटील तसेच अन्य विभागप्रमुख उपस्थित होते.**

बैठकीत माहिती देण्यात आली की, जिल्ह्यात अन्न औषध प्रशासन विभागामार्फत केलेल्या कारवाईत ३३७ अन्न नमुने घेण्यात आले. त्यापैकी २४४ नमुने प्रमाणित होते तर २६ नमुने कमी दर्जाचे होते. ९ नमुने मिथ्या छाप व ६ असुरक्षित होते. ५२ नमुन्यांचे अहवाल अद्याप प्रलंबित आहेत. ४७० परवानाधारक व १५८ नोंदणी धारक आहेत. त्यापैकी सुधारणा नोटीस ३२५ जणांना देण्यात आल्या. ८ जणांचे परवाना निलंबन करण्यात आले तर ३ लाख ४३ हजार रुपयांचा दंड ४२ जणांकडून वसुल करण्यात आला.

३२ ठिकाणी २० हजार ३०० किलो अन्न पदार्थ जप्त करण्यात आले. त्यांची किंमत २९ लाख ८२ हजार ६७५ रुपये इतकी आहे, असेही सांगण्यात आले. प्रतिबंधित अन्न पदार्थ संदर्भात ४८ ठिकाणी कारवाई करून ८० लाख ८२ हजार ४८५ रुपये किंमतीचे अन्न पदार्थ जप्त करण्यात आले. याच प्रकरणात आठ वाहनेही जप्त करण्यात आले असून ३७ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ३४ आस्थापनांना सिल करण्यात आले आहे, अशी माहिती देण्यात आली.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, अन्न औषध प्रशासन विभागाने नियमित कारवाया करताना स्वयंप्रेरणेने विशेष मोहिमा राबवाव्या. सद्यस्थितीत पावसाळ्याच्या अनुषंगाने लोकांना अन्नबाधा होऊ नये, या दृष्टीने प्रतिबंधात्मक कारवाई करावी. जिल्ह्यातून पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंड्यांच्या मार्गावरील हॉटेल्स, ढाबे येथील अन्न नमुने तपासावे असे निर्देशही त्यांनी दिले. पुढे उपवासांच्या कालावधीत भगर सेवनातून अन्नबाधा होऊ नये यासाठी नमुने तपासावे, लोकांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी लोकांना सुरक्षित व निर्भेळ अन्न मिळावे याची खबरदारी घ्यावी,असेही त्यांनी सांगितले.

# बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडेंची बदली

## लोकसभा निवडणुकीत झाले होते आरोप; अविनाश पाठक असणार नवे कलेक्टर

**बीड /प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत बीड लोकसभा मतदारसंघात ज्या प्रमाणे जातीय तेढ पाहायला मिळाले. त्याचप्रमाणे या ठिकाणी असलेल्या जिल्हाधिकारी दीपा-मुधोळ-मुंडे यांच्यावर देखील महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून आरोप करण्यात आले. त्यामुळे वादग्रस्त ठरलेल्या बीडच्या जिल्हाधिकारी मुंडे यांची निकालानंतर महिन्याभरातच बदली झाली आहे. आता बीडचे नवीन कलेक्टर म्हणून अविनाश पाठक हे असणार आहेत.**

अधिकाऱ्यांचा हस्तक्षेपावरून आरोप

राज्यातील लक्षवेधी आणि अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या लढतींमध्ये बीड लोकसभा मतदारसंघाची लढत झाली. महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे विरुद्ध महायुतीच्या पंकजा मुंडे यांच्यात थेट सामना रंगला होता. मात्र, निवडणूक प्रचारात बीड मतदारसंघात जातीय तेढ पाहायला मिळाले. या वादामुळे येथील निवडणूक जशी गाजली, त्याचप्रमाणे मतदान केंद्रावरील बोगस मतदान आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपाच्या आरोपामुळेही बीडची निवडणूक चर्चेत राहिली. आता, निवडणूक निकालानंतर महिनाभरातच बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.



### सोनवणे यांनी केला होता थेट आरोप

लोकसभा निवडणूक दरम्यान बीडच्या तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने अनेक आरोप केले होते. त्यामुळे, त्या चांगल्याच वादग्रस्त ठरल्या, महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून थेट तहसिलदार आणि जिल्हाधिकारी यांना मतमोजणीवेळी सहभागी होऊ न देण्याचीही मागणी केली होती. त्यामुळे, बीडच्या लोकसभा निवडणुकीत जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे वादग्रस्त ठरल्या होत्या.

### बीडचे नवे कलेक्टर पाठक

बीडच्या जिल्हाधिकारीपदी अविनाश पाठक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विनाश पाठक हे सध्या बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहत होते, त्यांची या पदावरून आता बीड जिल्हाधिकारी या पदावर बदली करण्यात आली आहे.

## 'नीट' घोटाळ्यामध्ये अनेक सबएजंट

आरोपींची कबुली:मुख्य सूत्रधार गंगाधर मराठवाड्यातीलच रहिवासी

लातूर - वैद्यकीय प्रवेश परीक्षेत (नीट) गुण वाढवण्याचे आमिष दाखवून अनेक पालकांकडून प्रत्येकी ४ ते ५ लाख रुपये उकळल्याचा प्रकार लातूरमध्ये उघडकीस आला. या रॅकेटमध्ये सहभागाच्या संशयावरून पोलिस कोठडीत असलेला जिल्हा परिषद शाळेचा मुख्याध्यापक संजय जाधव व शिक्षक जलील पठाण यांनी चौकशीत धक्कादायक माहिती दिली. या घोटाळ्यात जिल्ह्याजिल्ह्यात अनेक सबएजंट कार्यरत असल्याची कबुली त्यांनी दिली. दरम्यान, यापैकी २८ जणांपर्यंत पोहोचण्यात पोलिसांना यश आले. मात्र यातीलच काहींनी पाल्यांसाठी पैसे दिलेले आहेत. त्यामुळे या २८ जणांना पीडित पालक म्हणायचे की सबएजंट या संभ्रमात तपास अधिकारी आहेत.

पोलिस कोठडीत असलेला जलील पठाण व संजय जाधव यांनी नीट परीक्षेतील गैरव्यवहाराची बरीच माहिती पोलिसांना दिली. गेल्या ३ ते ४ वर्षांत पठाण व जाधवसारखे अनेक एजंट लातूर जिल्हा व मराठवाड्यात कार्यरत आहेत. त्यांनी जे पैसे जमा केले त्या विद्यार्थ्यांचे गुणही वाढवून देण्यात आल्याचा दावा या दोघांनी केला आहे. इतकेच नव्हे


### पाहिजेत

शिवराम हॉलमार्किंग सेंटर बीड येथे दोन बी.एस्सी. केमिस्ट्री पदवी धारक मुलांची गरज आहे. तरी कोणी असल्यास संपर्क करावा.

मो.९९२२८३३६८०
९९२११९३३८३


## राज्य सरकार अधिवेशनात गेमचेंजर निर्णय घेण्याच्या तयारीत

### मुलींना पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत?

मुंबई: राज्य विधिमंडळाच्या गुरुवारपासून सुरु होणाऱ्या अधिवेशनात महायुती सरकारकडून अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. हे महायुती सरकारच्या कारकीर्दीतील शेवटचे अधिवेशन आहे. यानंतर काही दिवसांमध्येच राज्यात विधानसभेची निवडणूक होईल. यादृष्टीने अधिवेशनात लोकप्रिय घोषणा, निर्णय आणि आश्वासनांची खैरात होण्याची दाट शक्यता आहे. अशातच आता राज्य सरकार या अधिवेशनात महिला मतदारांना खुश करण्याच्यादृष्टीने एक महत्त्वाचा निर्णय घेऊ शकते, अशी माहिती समोर आली आहे. राज्य सरकारकडून मुलींचे पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत केले जाऊ शकते. हा निर्णय शिक्षण घेत असलेल्या मुलींना मोठा दिलास देणारा ठरेल. तसेच आगामी विधानसभा निवडणुकीच्यादृष्टीने महायुतीला याचा राजकीय फायदा होऊ शकतो.

मुलींचे पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. यासंदर्भात गुरुवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सखोल चर्चा होईल, अशी माहिती आहे. यासंदर्भात प्रस्ताव दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे आता राज्य सरकार मुलींच्या पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्याची घोषणा करणार की नाही, याकडे सगळ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

महिलांना १५०० रुपयांची आर्थिक मदत?

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीच्या फक्त १७ जागा निवडून आल्या होत्या. हा महायुतीमधील तिन्ही पक्षांसाठी मोठा धक्का ठरला होता. याचीच पुनरावृत्ती विधानसभा निवडणुकीत झाल्यास महायुती सरकार कोसळू शकते. या पार्श्वभूमीवर राज्य सरकार महिला मतदारांना आकृष्ट करण्यासाठी मध्य प्रदेशातील 'लाडली बहन' योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्रातील महिलांसाठी एक नवी योजना सुरु करु शकते.गेल्या काही दिवसांपासून राज्य सरकार गोरगरीब, निम्न, मध्यमवर्गीय महिलांच्या बँक खात्यावर थेट पैसे जमा करण्याच्या उद्देशान एक योजना आखत असल्याची माहिती आहे. मध्य प्रदेश सरकार 'लाडली बहना' योजनेच्या माध्यमातून महिलांच्या खात्यावर प्रत्येक महिन्याला १२५० रुपये जमा करते.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT